# मल्मली

(मिश्र कवितासंग्रह - भाग ५)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**मल्मली** (मिश्र कवितासंग्रह – भाग ५)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई – ४०० ०३०.
भ्रमणध्वनी – ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट–२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
‘अे’ ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे – ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १–एन, सेक्टर ए, एन–१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर – ४३१००३.
भ्रमणध्वनी – ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-988171-5-0

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/–**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

'मल्मली' हे माझं अतिशय जिव्हाळ्याचं पुस्तक आहे. या कवितासंग्रहाचं बीज माझ्या मनात त्या क्षणी पडलं, जेव्हा मला जाणवलं की जीवनात सगळं काही ठामपणे सांगावं लागत नाही; कधी कधी फक्त हळुवारपणे जाणवू द्यावं लागतं. माझ्या लेखणीचा प्रवास हा मनाचा प्रवास आहे. मी जेव्हा लिहिते, तेव्हा शब्द माझ्या नियंत्रणात नसतात. ते स्वतःचे मार्ग निवडतात आणि 'मल्मली' म्हणजे अशाच स्वतः उमललेल्या शब्दांची फुलबाग आहे. ही कविता मी 'बोलण्यासाठी' लिहिलेली नाही, तर 'स्पर्शण्यासाठी' लिहिलेली आहे. माझ्या आयुष्यातील अनेक क्षण, अनेक नात्यांचे गंध, अनेक स्वप्नांचे तुकडे आणि काही निःशब्द वेदना हे सगळं या संग्रहात एकत्र आलंय. कधी पावसासारखं टिपूर, कधी धुक्यासारखं विरघळणारं, कधी उन्हासारखं उबदार.

या संग्रहाचं नाव 'मल्मली' स्फुरलं तेव्हा मला जाणवलं की हे नावच जणू या साऱ्या भावनांना सामावून घेतं. मल्मली म्हणजे केवळ मृदू नाही; ती म्हणजे निखळता, निर्मळता, आणि नाजूक प्रामाणिकपणा. या कवितांमध्ये कोणतंही सजावटीचं साहित्य नाही, कारण जीवनाचं सौंदर्यच पुरेसं आहे.

मी जेव्हा एखादी कविता लिहिते, तेव्हा माझं मन पूर्णपणे त्या भावनेत विरघळतं. कधी ती भावना माझी असते, कधी ती कुणा दुसऱ्याची असते पण मी तिला जशी आहे तशीच कागदावर आणते. शब्दांना मी दाबत नाही, त्यांना वाहू देते. कारण मला वाटतं जेव्हा भावना मोकळ्या होतात, तेव्हाच त्या खरं सौंदर्य दाखवतात. या कवितांमध्ये प्रेम आहे, पण मालकी नाही. दुःख आहे, पण निराशा नाही. वेदना आहेत, पण त्यात करुण सौंदर्य आहे. मला वाटतं, कविता म्हणजे हाच तो संतुलनाचा शोध जिथं माणूस स्वतःला उलगडतो, पण त्याचवेळी पुन्हा सावरतो.

'मल्मली'च्या प्रत्येक कवितेत मी माझ्या आत्म्याचा एक तुकडा ठेवला आहे. कधी तो पावसात ओलावलेला आहे, कधी धुक्यात हरवलेला, कधी प्रार्थनेच्या स्वरात विरघळलेला. वाचकाने ती कविता वाचताना जर एक क्षण जरी

स्वतःकडे पाहिलं, तर माझं लेखन सार्थ ठरेल. कविता म्हणजे माझ्यासाठी ‘आश्रय’. ती माझं बोलणं ऐकते, ती मला परत बोलते. ती मला जगायला शिकवते कारण कविता म्हणजे शब्दांतील प्राणवायू.

‘मल्मली’ ही माझी आत्मीयता आहे; माझ्या भावनांची, माझ्या स्त्रीत्वाची, माझ्या माणूसपणाची. आज या संग्रहाच्या प्रकाशनाच्या क्षणी, मी मनापासून म्हणते ‘माझ्या लेखणीला शब्दांचा गौरव नको, मला फक्त हृदयाचा स्पर्श हवा.’

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

'मल्मली' हे नाव उच्चारताच जणू एक कोमल गंध हवेत पसरतो. शब्दाच्या स्पर्शातच एक मृदुता आहे, जणू आईच्या हाताच्या स्पर्शासारखी, वा पावसात पहिल्यांदा उमलणाऱ्या मोगऱ्याच्या फुलासारखी. या कवितासंग्रहाच्या नावातच त्या कवयित्रीच्या मनाचा स्वभाव दडलेला आहे. मृदू, पण दृढ; कोमल, पण गहिरा.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांची लेखणी म्हणजे भावनांचा नाजूक झरा. 'मल्मली' हा त्यांच्या कविताप्रवासातील तो टप्पा आहे, जिथे शब्द केवळ विचारांचे नव्हे, तर हृदयाच्या गाभ्यातून उमटणाऱ्या भावनांचे माध्यम बनतात. या संग्रहात त्या स्त्रीमनाच्या कोमल लहरींना, जगाच्या निखळ सौंदर्याला आणि अंतर्मनातील आत्मसंवादाला कवितेतून शब्द देतात. विंदा करंदीकर म्हणतात, 'कविता म्हणजे मनाची मलमल.' मल्मली हाच त्या विचाराचा प्रतिध्वनी आहे. या कवितांमध्ये ना कोणते गोंगाटी घोष आहेत, ना कोणती मोठी तत्त्वचिंतनाची वलये. पण आहे ती भावनांची मखमली शांतता. जी हळुवार पसरते आणि वाचकाच्या मनाला आलिंगन देते. कवयित्रीच्या मनात जेव्हा काहीतरी उसळतं, तेव्हा त्या भावनांना ती आटोक्यात ठेवत नाही. ती त्यांना वाहू देते. हळुवार, नाजूक, पण निश्चयी ओघात. म्हणूनच या कवितांमध्ये कोणताही कृत्रिमपणा नाही. या कविता मनातून येतात आणि मनातच विसावतात.

'मल्मली' या संग्रहात स्त्रीमनाचं भावविश्व अनेक रूपात उलगडतं. कधी आईच्या मायेचा स्पर्श, कधी प्रेमिकेच्या हळव्या प्रतीक्षेचा थरार, कधी मुलीच्या निरागसतेचा सुगंध, तर कधी नारीच्या आत्मभानाचा तेजस्वी प्रकाश हे सगळं या कवितांमध्ये मृदू, पण प्रभावी स्वरात गुंफलेलं आहे. या कवितांमध्ये समाजावर भाष्य नाही, पण समाजाची छटा आहे; त्यात तत्त्वज्ञान नाही, पण अनुभवाची

शिकवण आहे. कवयित्रीच्या शब्दांत एक विशेष मऊपणा आहे. तो मऊपणा केवळ स्त्रीत्वाचा नाही, तर मानवतेचा आहे. ती जिथं लिहिते, तिथं करुणा आणि कोमलता यांचं संमिश्र सूरताल जाणवतो. पु.ल. देशपांडे यांच्या नातेसंबंधातील हृद्य विनोद, वा.पु. काळे यांच्या भावविभोर नाजूक भावस्पर्श, आणि नासिफडक यांच्या साध्या, रोजच्या जगण्यातील काव्यात्मता. या तिघांचं एकत्र दर्शन 'मल्मली'मध्ये घडतं. पण तरीही ही कवयित्री कुणाची छाया नाही; ती स्वतःची आहे. तिचं मन स्वतंत्र आहे, तिची शैली तिच्या आत्म्याशी नाते सांगणारी आहे.

'मल्मली' वाचताना वाचकाला एक अनुभव येतो. जणू कुणीतरी मनाच्या कपाटात दडवलेली जुनी, पण गंधाळलेली पत्रं उघडली आहेत. त्या प्रत्येक पत्रात एक स्मित, एक हळवी आठवण आणि एक अपूर्ण संवाद आहे. ते पत्र बंद करताना डोळे पाणावतात, पण मन शांत होतं. हीच 'मल्मली'ची शक्ती आहे. प्रत्येक कविता ही एक स्मितभर स्पर्श आहे. ती वाचकाला काही शिकवते असं नाही, पण काही जाणवायला लावते. कविता वाचून झाल्यावर आपण काही न सांगताही काही समजून घेतो. हीच खरी साहित्याची जादू.


'मल्मली' हा केवळ कवितासंग्रह नाही, तो स्त्रीमनाचा नाजूक प्रवास आहे. बालपणापासून आत्मभानापर्यंत, अश्रूंपासून हसवण्यापर्यंत. त्यात हळवेपणा आहे, पण हतबलता नाही; त्यात कोमलता आहे, पण कमजोरी नाही. त्यात भावना आहेत, पण त्यावर विचारांची नाजूक छटा आहे. साहित्यविश्वात 'मल्मली' ही एक अशी रेशमी झुळूक आहे, जी कुणाचंही मन हळुवारपणे गच्च मिठीत घेते. ती जिव्हाळ्याने सांगते 'मृदू होणं ही कमजोरी नाही, मृदू होणं म्हणजे पूर्ण माणूस होणं.'

**श्री. नंदकुमार पाठक (गुरुजी)**
छत्रपती संभाजीनगर

# अनुक्रमणिका


१) आता आली उगवून ... ११
२) ना बोचतील काटे ... १२
३) नुसतेच श्वास आले ... १३
४) डोळ्यात आसवे का ... १४
५) माझी वात्सल्याची ठेव ... १५
६) अंबे जागर जागर ... १६
७) अंबे जगदंबे ... १७
८) अंबे येईन दर्शना .. १८
९) तुझ्या शरणी मी रहाते ग ... १९
१०) अष्टभूजा अंबाबाई ... २०
११) तू विद्याविहारा ... २१
१२) वात्सल्याची तू मूर्ती ग ... २२
१३) पद्मासना पद्महस्ता ... २३
१४) लुटू सोनं आनंदाचं ... २४
१५) पद्मा लक्ष्मी हरिप्रिये ... २६
१६) म्हणून देतो जन्म आईला ... २७
१७) दोस्ती पहावी नवी ... २८
१८) तू जपून टाक
पाऊल सजनी ... २९
१९) भरात कोजागरती ... ३०
२०) शरद पौर्णिमा
अलंकार जणू ... ३१
२१) कोजागिरी संपलीच
नाही न ... ३२
२२) देवी शारदे, भक्ततोषिणी ... ३३
२३) घडते नवेच काही ... ३४
२४) सोनचाफ्या गंधबेड्या ... ३५
२५) जगण्याचे पान असावे ... ३६
२६) दिवाळीच्या आठवणी ... ३७
२७) तू प्रिये जगणे नवे ... ३८
२८) ठेव दे देवा अशी ... ३९
२९) कोणती ग गीतिका तू ... ४०
३०) निसर्गातली रम्य दिवाळी ... ४१
३१) गोधन ऐसे धन हे अपूर्व ... ४२
३२) धनत्रयोदशी येते ... ४३
३३) सांगा दिव्यास कोणी ... ४४
३४) तेजा देऊन जाते ... ४५
३५) लक्ष्मीपूजन करावे ... ४६
३६) वाढो मधुर गोडवा ... ४८
३७) भाऊबीज ओवाळीते ... ४९
३८) दे सख्या मज प्रीत भावन... ५०
३९) भाग्यवती मज हातीची ... ५१
४०) छंद कमळ
जडू दे न जीवा ... ५२
४१) आजही जेंव्हा
पाहतो सुरंगी ... ५३
४२) वाटे मला कितीदा ... ५४
४३) जगणे खरे असावे ... ५५
४४) गाव तोच रेखावा ... ५६
४५) काट्यातल्या गुलाबा रे ... ५७
४६) ऐक बा विठ्ठला ... ५८
४७) हातातल्या गुलाबाने ... ५९
४८) लावण्ये घडविले ... ६०
४९) भाग्यज्योती उजळे ... ६१
५०) नवसूर्याचा उदयगिरी ... ६२
५१) सुंदर जीवन सुंदर लोचने ... ६३
५२) हे वेडाचे वेडूऽऽ कोडे ... ६४
५३) झाडा तुझ्या फांदीवर ... ६५

५४) मोहित वेळ ही करते ... ६६
५५) त्या देवाचे काय त्यात हो... ६७
५६) जगणे असेच चाले ... ६८
५७) पापणी कोरली येथे ... ६९
५८) मधे वाहते जीवन सरिता ... ७०
५९) तैसीच वाटे
ही चूल जननी ... ७१
६०) नतमस्तक होई मी
चरणी जगन्नाथा ... ७२
६१) जगणे सुंदर व्हावे ... ७३
६२) माणूस आपलं जगणं सारं... ७४
६३) इवली चिमणी राहते मनी... ७५
६४) रीत कशी मोगऱ्याची ... ७६
६५) इथे विसावती कला ... ७७
६६) अशी पहावी जरा बकुळी... ७८
६७) ईश आहे आसरा ... ७९
६८) सांगते सृष्टी ही काय ... ८०
६९) जा उडा फुलपाखरांनो ... ८१
७०) नखशिखांत साजामध्ये ... ८२



**(१)**

**आता आली उगवून**

तुझ्या माझ्या हाती आलं
सुखासुखी दान
आयुष्याचं नवं नवं
पालवीचं पान

गेले होते ऋतू सारे
येऊन भराला
उंबऱ्याच्या आत मन
रिकामं घराला

फोल फोल जगण्याचा
डोह खोल खोल
नाही जे मिळाले त्याचे
किती किती मोल

आता आली उगवून
पहाट नवी
मावळू न द्यायची
जी उषा हवी हवी

दि.२८/०९/२०२४
सकाळी ०९.१२ वा.



## (२)
## ना बोचतील काटे

आवाज दे प्रिया तू
देईन हाक तुजला
जुळतील सूर आपुले
अनुराग भाव सजला

घुमतील नाद सोबत
अवकाश पोकळीत
चैतन्य उसळू येईल
सुमना मना कळीत

आरोह चढते चढतील
अवरोह साथ सोबत
आलाप गायनाचे
आयुष्य जाय सोबत

झाली दिशा नवी ही
क्षितिजास जाग आली
जो अस्त मानलेला
उदयास भाग्य घाली

सारे नवेच वाटे
ना बोचतील काटे
माझ्या मनात आशा
उमलून आज दाटे

दि.२९/०९/२०२४
सकाळी १०.२१ वा.



## (३)
## नुसतेच श्वास आले

वाटून जायचे की
आता कुणी न भेटे
पहिल्याप्रमाणे सांगा
मायेस कोण खेटे


ऐश्वर्य माया होता
आटतो झरा जिव्हाळा
पैसाच प्यारा होई
त्या कमविण्याचा चाळा

आपुलकी न आता
पान्हा तसा फुटेना
ममता नि स्नेह लुप्त
आधार तो कुठे ना

वाहतात रुक्ष वारे
धारा न ओलव्याच्या
दुर्भिक्ष भावनांचे
सीमा हजार त्याच्या

ना मोकळे कुणीही
बंदिस्त विश्व झाले
जगणे कसे म्हणावे
नुसतेच श्वास आले

दि.३०/०९/२०२४
सकाळी ०६.५४ वा.



## (४)
## डोळ्यात आसवे का

डोळ्यात आसवे का
ऐसे पुसू नको रे
खपल्या पुन्हा व्रणांच्या
काढू पुन्हा नको रे

गहिऱ्या खुपून बसल्या
ज्या वेदना तळाशी
वडवा जसा लपावा
वर शांतशा जळाशी

दुखणी किती जपावी
की हानी आठवावी
कित्येक भावनांची
गठडी का साठवावी

नसते कधीच उत्तर
भेसूर प्रश्न छळती
नियतीचे फासे कैसे
कोणास कधी कळती

दाबून ठेवलेल्या
अश्रूंस वाट देते
माझेच दुःख फिरुनी
भेटावयास येते

दि.०१/१०/२०२४
रात्री ०८.१० वा.




## (५)
## माझी वात्सल्याची ठेव

आई तुझ्या पदराशी
बाळ सुखावला
मायेसाठी आजही
तुझ्या भुकावला

माया तुझी वाढते ग
वयासारखी
दुनिया न व्हावी माये
तुला पारखी

तरी नको होऊ कधी
दूर माझ्यापासून
आई घे ना कुशीतून
मला तू ग हासून

तुझ्या बरोबर जे मी
जगलो ग माय
त्याच्याविना अमृत
दुसरं ते काय

आहेस तू आहे माझ्या
जवळी हा देव
देवा, हिरावू नको रे
वात्सल्याची ठेव
माझी वात्सल्याची ठेव

दि.०२/१०/२०२४
सकाळी ०७.५४ वा.



## (६)
## अंबे जागर जागर

अंबे जागर जागर
तुझा जागर करते
ओटी भक्तीने भावभक्तीने
माय तुझी मी भरते

माळ परडी कर्माची
जोगवा मागते
असो संचित काहीही
भाग्य कृपेचे लागते

काम क्रोधाचे उपवास
तपदमसंयमाचे
फेरे चुकविशी एक्याऐंशी
भोग नि तमाचे

कवडी कवडी विपदा
कवडीमोल ठरवीशी
माझी दुरिते दुःखे तू
असुरागत हरवीशी

आज नवरात्री आरंभ
तुझ्या चरणी बसू दे ग
माझ्या जीवनी, माझ्या ग मनी
तुझे रूप सदा वसू दे ग

दि.०३/१०/२०२४
रात्री ११.५७ वा.



## (७)
## अंबे जगदंबे

मळवट भाळावर अंबेच्या
शोभतो कुंकवाचा
अंबे जगदंबे टळू दे ग
संत्रास हा भवाचा

हळदी कांचनी तेजाची
कांती तुझी झळकते
डोळ्यातून ते करारी
तेज तुझ्या ग फळते

नाकी नथनी कानी कुंडले
मुकुट शिरावरी
गाईन ग अंबे मी
तुझ्या गुणस वरचेवरी

एक तेजश्री एक मधुश्री
एक मंजुश्री तू गौरी
एक पद्मश्री एक विभवश्री
एक यशश्री विभावरी

नव रूपे ती नव नवलाई
अनंत शक्ती गाजे
अंबे त्रिखंडी शौर्याचे
कीर्ती ढोल बघ वाजे

दि.०४/१०/२०२४
रात्री ०८.४४ वा.



## (८)
## अंबे येईन दर्शना

अंबे येईन दर्शना
लगऽऽबगीनं
रूप तुझं ग साठवून,
डोळ्यात घेईन

तुला साडी नि चोळीचा,
आहेर आणला ग
ओटी भरून चरणी
मस्तक ठेवीन

गर्दी संसारी संसारी
संकट भरली
जाती लयाला विपदा
तूच भक्तं ग तारली

आज चालता चालता
तुझ्या मंदिराचा रस्ता
आला उत्साह प्रपंची
किती खाल्ल्या जरी खस्ता

तुझी परडी भरली
पीठानं मीठानं
माझं दुर्भाग्य तुझ्या
कृपेनं सहज फिटावं

दि.०५/१०/२०२४
रात्री ११.४९ वा.



## (९)
## तुझ्या शरणी मी रहाते ग

सिंहारुढ जगदंबेच्या
वीरत्वाची गाथा
तिच्या मंदिरी टेकवू
भक्तीने हो माथा

तिच्या हातात शस्त्रांचा
शोभतो की मेळा
निर्दालून ती असुरा
पायी चिरडून गळा

तिच्या हुंकारे कापती
राक्षस चळचळा
तिच्या हृदयी लेकरां
साठी कळवळा

तुझ्या गळ्यात वीरश्री
माळा शोभती ग अंबे
आदिशक्ती तू ईश्वरी
माय पोटी घे लेकरा ग अंबे

तुझ्या मुखी समाधान
हास्य विलसून जाते ग
आराधना फळू दे
तुझ्या शरणी मी रहाते ग

दि.०६/१०/२०२४
दुपारी ०१.२१ वा.




## (१०)
## अष्टभूजा अंबाबाई

अष्टभूजा अंबाबाई
सिंहारूढ तू तेजाई
भवसागर तरण्या
आता कृपा तुझी होई

क्रूर विक्राळ अधम
राक्षसांचा माजे क्षण
आली आली तू धावत
घाव पडतात घण

हाती धनुष्य ताणले
गदा घाव तू घातले
त्रिशूलाचा शूळ बोचे
खड्गे दोन भाग केले


विव्हळत लोळविला
माज त्याचा उतरवीला
असुरासी निर्दालून
भक्तगण तो तारीला

आई समरात रूप
तुझे प्रचंड रुद्राचे
डोळा आग ओकतेस
ठाव काय अभद्राचे

येई येई वो मंदिरी
शांत व्हावे तू सत्वरी
मळवट भरते मी
विडा देते ग केशरी

तुझ्या चरणांची सेवा
माझा जन्माचा तो ठेवा
मी लेकरू तू माय
जगतास वाटे हेवा

दि.०७/१०/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (११)
## तू विद्याविहारा

नानाविध रूपे तव
शक्तिस्वरूपे
तू वीरा एकवीरा
ज्ञानप्ररूपे

शांता प्रशांता
तू विद्याविहारा
शुद्धा तू बुद्धा माते
तू वाणी निहारा

वीणा वादिनी तू
कला प्रदायिनी
मयूरवाहना अंबे
ब्रह्मज्ञानिनी

फिरती करांगुली
वीणेवर सरला
सप्त सुरांची तू
संवादिनी तरला

तू शब्द तू अर्थ
तू वाणी प्रमाणी
तू नाद संवाद
तू सत्त्व दानी

दि.०८/१०/२०२४
रात्री ०९.३७ वा.




## (१२)
## वात्सल्याची तू मूर्ती ग

साऱ्या देवतांचे तेज
एकवटूनिया आले
श्रीदेवी तुझे रूप
असे प्रकटुन आले

किती ओतली तू शक्ती
दुष्ट असुर भेदण्या
तूच एक ग पुरेशी
तम जाळे ते छेदण्या

तुझ्याविना शिवा वाटे
सारा संसार असार
तुझी कृपा होता शिवे
लाभे सुख की अपार

दशभुजा तू सुंदरी
हाती शस्त्रे ही शोभती
शूरवीरे तुझी कृपा
भाग्यवानास लाभते

कर्तव्यासी निभावून
रूप शांतल शीतल
वात्सल्याची तू मूर्ती ग
स्नेह स्नेहाळू स्नेहल

दि.०९/१०/२०२४
रात्री ११.३२ वा.




## (१३)
## पद्मासना पद्महस्ता

तूच ऐश्वर्या संपदा
विभवा नि रम्य रमा
तूच कमला विमला
तूच विष्णूची विरमा

पद्मासना पद्महस्ता
धनश्री तू सुख दात्री
श्रीविष्णुपद सेवा
त्रिभुवन सौख्य धात्री

हाती घट त्यात नाणी
बरसून दे सुखानी
गजांत लक्ष्मी तूच
जपे मानव मुखानी

तुझ्या विना निर्धनता
तुझी कृपा दे संपदा
धावा तुझा करताच
जाती लयाला विपदा

धनवान पुण्यवान
गणमान्य मान पावे
क्षीरसागरी जशी तू
आम्हा घरी निवसावे

दि.१०/१०/२०२४
रात्री १०.३१ वा.



## (१४)
## लुटू सोनं आनंदाचं

अश्विन शुद्ध दशमीला
विजयाचा दिनु
जय मिळविण्या युगे
युगे गाथा विणु

साडे तीन मुहूर्तातील
मुहूर्त हा एक
शुभ शुभ करू सारे
नियत ही नेक

छात्र सारे पूजतात
देवी शारदेला
शस्त्र पुजूनीया वीर
युद्धदेवतेला

गावामध्ये ईशान्येला
सीमोल्लंघनाला
अपराजिता देवीच्या
चला पूजनाला

महिषासुर वधण्याला
पार्वती दुर्गा
शुंभ निशुंभ चंड
मुंडासी चामुंडा

दशानना मारीयले
जिंकूनिया लंका
वाईटावर चांगल्याच्या
विजयाचा डंका
राम झाले युग
युगातून नरश्रेष्ठ
कर्तव्यासी प्रत्येकाने
तसे व्हावे ज्येष्ठ

पांडवांनी शमीवृक्षा
वर लपविले
शस्त्र आज काढुनिया
युद्ध जिंकीयले

वरतंतू शिष्य कौत्स
गुरुदक्षिणेला
चौदा कोटी मुद्रा मागे
अयोध्यी रघूला

कुबेराने बरसून
खजिना की दिला
कौत्सा देऊन उरलेला
शमीशी ठेवियला

जनतेने दसऱ्याला
खजिना लुटला
म्हणूनिया शमी पाना
सोनं मान भेटलेला

लुटू सोनं आनंदाचं
विजयाचं पान
देवा दे रे आज मला
जयरूपी दान

दि.१२/१०/२०२४
????? ??.?? ??.



## (१५)
## पद्मा लक्ष्मी हरिप्रिये

तू परमसुंदरी मनोहाऽऽऽरी माते
मज ठाव देई तू सदा तुझ्या पदराते
महाविद्ये महाकाली महालक्ष्मी मनोज्ञे तू
शिवप्रिये विष्णुमाये शुभे मंगल जगन्माते

शांते सिद्धे सरस्वती क्षमे कांती हे ज्योत्सने
सर्वमंगले पार्वती चंडिका तू हिंगुले
पद्मा लक्ष्मी हरिप्रिये त्रिपुरे नंदित नंदिते
सुनंदे यज्ञविद्ये तू सकले सुरवंदिते

महामाये वेदमाते गायत्री अन्नपूर्णे तू
सुधे अमृते धृती प्रीती प्रथे मृडानी सिद्धे तू
विंध्यवासिनी सिध्दविद्ये महाशक्ती तू पृथ्वी
नारदसेविते पुरहूतप्रिये कांते तू मनमोहिनी

कामिनी रागिणी मानिनी अभिमानिनी
पद्मलोचने श्रीदुर्गे तूच दुर्गतीनाशिनी
गोत्रे सुगोत्रे ज्योतिषे तूच हृदयप्रल्हादिनी
दुर्लभे दुर्गमे गे माये सुनित्ये कुमुदवासिनी

अपर्णे शांबरीमाये मृदूहासिनी जगदंबे
कुलवागेश्वरी कृशोदरी नित्ये नीले निलांबरे
सर्वसौभाग्यवर्धिनी नित्य भाग्यप्रवर्तिनी
नारसिंही तू वैष्णवी कात्यायनी तू ओंकारे

अनंत नामे अनंत शक्ती अनंता ग तू जगदंबे
प्रज्ञा देशी शक्ती देशी देशी संपदा तू अंबे
अन्नधान्यप्रदात्री तू श्रीकांती देहचैतन्ये
आत्मतत्त्वे आत्मभावे परमेश्वरी शांभवे

दि.११/१०/२०२४
सकाळी ०६.४७ वा.



## (१६)
## म्हणून देतो जन्म आईला

चोचीमधल्या चोच कहाण्या
पिल्लांसाठी सोस
वात्सल्याचे क्षण हे टिपावे
लोचनात भरघोस

तिन्ही त्रिकाळी येते आई
चारा दाणे घेत
भरवून जाते घास मायेने
एक दिलासा देत

जीव इवलुसे इवल्या गाठी
गतजन्मीच्या नात्यासाठी
कोण कुणाच्या साठी झटते
कोण कुणाच्या राहे पाठी

झिजवून काया झरते माया
डोळे पाणावून
ती असते वा नसते तरीही
काळीज जा न्हाऊन

आई म्हणजे काय रसायन
देवासी कळले ना
म्हणून येथे अवतारातून
प्रेम तिचे फळले ना

असो कोणती काया माऊली
माया तीच दिसते ना
आई बाहेर आई आतून
कणाकणात वसते ना

आई म्हणजे तत्त्व आगळे
तत्वांच्या पलीकडले
आईविना मग जीवन सारे
अडखळून का अडले

उत्तर नाही त्याच्याकडेही
आई अशी घडण्याला
म्हणून देतो जन्म आईला
बाळ पुन्हा होण्याला

दि.१३/१०/२०२४
सकाळी ०९.२५ वा.



## (१७)
## दोस्ती पहावी नवी

आकाशाचा राजा आला
वनराजा पाशी
काय विचारबे आता ती
मैत्री हो खाशी

कोण कुणाच्या येईल कामी
हे न मनी आले
क्षणात तयांच्या मित्रपणाचे
धागे घट्ट झाले

म्हणे सिंह चल सैर करवितो
तुजला वनराईची
उंच नभाचा गरुड राज तू
भ्रमंती न घाईची

तू वाहन त्या श्रीविष्णूचे
मी दुर्गा देवीचे
देवत्वाचा स्पर्श होतसे
पुण्य काही ठेवीचे

घे आतिथ्या अरण्यातल्या
मेजवानी जी हवी
देवीदेवतांच्या वाहनांची
दोस्ती पहावी नवी
अशी ही दोस्ती पहावी नवी

दि.१४/१०/२०२४
रात्री १०.४६ वा.



## (१८)
## तू जपून टाक पाऊल सजनी

तू जपून टाक पाऊल सजनी
वाट घसरडी आहे
हात हाती दे प्रिये प्रियतमे
भूमी निसरडी आहे

कुठून वाहतील पाट जलाचे
चिक्कन माती चिक चिक
हिरव्या हिरव्या गवतपातुल्या
खलले काजळ छिक छिक

तुझ्या लाजऱ्या मुखड्यावरती
रान पुरे भाळले
लता वेलींनी कुसुम फुले तुज
वेणीतून माळले

ये ये राणी आतुर वाणी
माझी झालेली
आज अंगणी सखी लाडकी
माझी आलेली

कसे पाहू मी सृष्टी इथली
सौंदर्या नटलेली
तुझ्या कराला स्पर्श होतसे
गात्रे ही गोठलेली

शहारलेली काया माझी
प्रीत तुझी भरलेली
मनात नाही काही अजुनी
तूच तू सखी उरलेली

दि.१५/१०/२०२४
रात्री ०९.१४ वा.



## (१९)
## भरात कोजागरती

कोजागिरीच्या चांदण्यातल्या
आपुल्या चांदण वेळा
लुकलूक भरल्या किती चांदण्या
आकाशातून मेळा

चंद्र हासतो खुदखुद गाली
प्रकाश पसरून गेला
कुणीतरी मज प्रिया मुखाचा
चंद्र ढगाआड  केला

झरझर झरल्या चांदण धारा
मेघांच्या पडद्यातून
नभात आले मेघ पांढरे
खुशीत लहरत आतून

आज कलांनी साऱ्या देखणा
असा चांदवा गोड
तुझी नि माझी दृष्ट न लागो
अशी देखणी जोड

वर्षभरातून येई एकदा
भरात कोजागरती
जीव जडविला सखे साजनी
जीवापाड तुजवरती

दि.१६/१०/२०२४
रात्री ११.३३ वा.



## (२०)
## शरद पौर्णिमा अलंकार जणू

शारद पुनव ही नवान्न पोर्णिमा
म्हणुनी गणली जाते
कृषीवलांच्या घरी संपदा
धान्यलक्ष्मी ही रहाते

अश्विन मासी नवरात्रीच्या
शुभे पाऊले येते
विजयादशमी देऊन विजया
बळा वाढवून देते


नवीन आले धान्य जे घरा
कणग्यांमधुनी चला हो भरा
वर्षभराच्या अन्नासाठी
शेतामध्ये कष्ट की करा

नवान्न अश्विन पोर्णिमेस हे
नैवेद्या दावूनी
सुरू करायचे आता पहायचे
पदार्थ ते खाऊनी

नव्या तांदुळाची खीर करुनी
कोजागिरीच्या राती
जे धान्य आले घेऊन हाती
लक्ष्मी मातेसाठी

असा सोहळा भारतीय हा
अन्न परंपरेचा
शरद पौर्णिमा अलंकार जणू
प्रियतम युगंधरेचा

दि.१७/१०/२०२४
सकाळी ०६.५३ वा.




## (२१)
## कोजागिरी संपलीच नाही न

अजून तुझ्या मनातली
कोजागिरी संपलीच नाही न
रेंगाळत बसला आहेस
क्षण चंद्रम्या मनात तुझ्या काही न

सारी वसुधाच तुझ्या कौतुकानं
चांदण्यात न्हाली होती
प्रियकराची प्रियतमाही
धुंद चांदणी झाली होती


बहाणे कितीतरी शोधले लोकांनी
तुझ्यासवे बसण्याचे
गप्पा गोष्टी करत करत
मुक्त जरा हसण्याचे

कुणी आळवले सुरेल गाणे
कुणी आठवणी काही
कुणी जुन्या काळात मदभऱ्या
निज काळजा पाही

प्रत्येकाची को जागर्ति
किती स्फूर्ती ची झाली
तुला चांदव्या सांग कुणाची
खरंच आठवण आली

आजही तू तिथेच आणि
तसाच तेजाळलेला
सागर देखील प्रिया सुखास्तव
उधाण फेसाळलेला

दि.१८/१०/२०२४
सकाळी ०६.४३ वा.



## (२२)
## देवी शारदे, भक्ततोषिणी

प्रसन्न मुद्रे पुस्तकधारिणी
स्वमग्ननिरता तू वीणा वादिनी
सुहास्यवदना मुक्तकेशिनी
मधुर माधुरी हे मंजुभाषिणी
देवी शारदे, भक्ततोषिणी ।।१।।

भाषा भारती तू वाग्विलसिनी
समाराधने कृपा प्रदायिनी
करांगुलीतून स्वरां आळवून
सुरम्य स्वर झंकारकारिणी
देवी शारदे, भक्ततोषिणी ।।२।।

सालंकृत तू अलंकारिणी
नवरस धात्री भाषाकामिनी
नानाविध साहित्यविधांची
तूच सरस्वती उगमप्रदायिनी
देवी शारदे, भक्ततोषिणी ।।३।।

संगीताची सप्तसुरावणी
स्वर्गीय सारे सूरमोहिनी
आत्मिक ब्रह्मज्ञानदायिनी
सद्बुद्धीची तूच सारणी
देवी शारदे, भक्ततोषिणी ।।४।।

प्रज्ञा प्रतिभा मेधा जननी
वेदज्ञानमुनीजनमननी
अतुल्य दे वरदान शारदे
साहित्याच्या उत्तम करणी
देवी शारदे, भक्ततोषिणी ।।५।।

दि.२०/१०/२०२४
सकाळी ०७.४७ वा.



## (२३)
## घडते नवेच काही

प्रीतीत मोगऱ्याचा
गजरा फुलून आला
पाहून भाव वेडे
परिमळ खुलून गेला

होती कळी कळी जी
उमलून फुल झाली
दडल्या मनात खोल
प्रेमास जाग आली


गालात हासलेल्या
अवखळ खळ्या स्मराव्या
वाऱ्यासवे बटा त्या
उडत्या करी धराव्या

कानात डूल हलती
करती मला इशारे
बदलून कैशा जाती
आता अशा दिशा रे

घडते नवेच काही
प्रणयास जाग येते
रती कामदेव हृदयी
मोहून बाग होते

प्रीतीत चार हात
दूर नसतो कधीच स्वर्ग
प्रेमात सत्त्व भाव
सकारतील सर्ग

दि.२१/१०/२०२४
उत्तररात्री ०१.०० वा.



## (२४)
## सोनचाफ्या गंधबेड्या

सोनचाफ्या काय झाले ना कळताना
पावसाचे अंग झाले उमलताना

एक टोक फांदीवरले का गहिवरले
पान पान आठवांनी का थरथरले

एक गेला पानगळतीचा ऋतू जो
आसवांनी सांडला होता उतू जो

एकटा फांद्यासवे जगताच आला
बागडून मधुमास बहरा धुंद झाला

पल्लवांच्या विभ्रमांना रंग आले
कोवळाले नवनवाले कोंब आले

डोकवून आल्या कळ्या ज्या हासऱ्याशा
अन फुलांच्या हिंदोळी झुलल्या जराशा

पावसाने चुंबिले त्या पाकळीला
उमटूनी आल्या दवांच्या त्या खळीला

सोनचाफ्या लाजणाऱ्या लाजवेड्या
बांधती आम्हा तुझ्या रे गंधबेड्या

दि.२२/१०/२०२४
रात्री ०८.३७ वा.



## (२५)
## जगण्याचे पान असावे

जीवन म्हणजे पर्ण इवलुसे
जीवनचक्राच्या झाडाचे
गतजन्मीचे संचित मूळ हे
कर्म अनामिक त्या खोडाचे

वृक्ष वाढतो पुण्य पापाचा
पाने लगडून जाती काही
अगणित जन्म जे जीवा लाभती
मानव मंजिरी त्याविण नाही

ऋतू वेगळाले ते येती
काही सुखाचे अन दुःखाचे
अंगी बळ हे हवे झेलण्या
तडाखे अवचित की वादळाचे

हळूच बुद्धी व्हावी ऐसी
दुर्गुण दुष्प्रवृत्ती हो गळावी
नको ते सारे कोरून काढून
हवी ती नक्षी रेखून द्यावी

कुणी न विसरेल ऐसे काही
हे जगण्याचे पान असावे
नक्षीमधल्या रेषांमधुनी
भाग्य आपुले अलगदसे हसावे

दि.१९/१०/२०२४
सायं. ०५.५१ वा.



## (२६)
## दिवाळीच्या आठवणी

आला सण दिवाळीचा
उत्सव हा प्रकाशाचा
घरोघरी दीप लावू
महोत्सव हा तेजाचा

दारी सडा नि रांगोळी
अभ्यंगाच्या हो अंघोळी
फराळाची रेलचेल
जोडी पुरणाची पोळी

नव्या वस्त्रांचा सुवास
उटण्याचा धुंद वास
पूजा देवांची आरास
स्मृती दिवाळीच्या खास

चिल्ल्या पिल्ल्यांची धमाल
फटाक्यांची ती कमाल
रंग नभातून लाल
रोषणाई बेमिसाल

भेटीगाठी प्रेमभऱ्या
मीलनाच्या ओढी खऱ्या
लाडू करंज्या साटोऱ्या
दीपावलीच्या पेटोऱ्या

अशी येते दीपावली
दिव्या दिव्यांची अवली
लक्ष्मी कांचन पावली
पाडवा भाऊबीज भली

दिवाळीच्या आठवणी
मना कुठे पाठवणी
काळजात साठवणी
डोळ्यातून दाटवणी

एक दिवा तेवतो जो
काळजात राहतो जो
झरा माया वाहतो जो
वाट माझी पाहतो तो

दि.२३/१०/२०२४
रात्री ११.४३ वा.



## (२७)
## तू प्रिये जगणे नवे

कल्पनेतील तूच माझी
देखणी मनमोहिनी
देखता मज तृप्तता ती
तूच कमनीय कामिनी

केशसंभारात गजरा
माळलेला तू जसा
काळजाच्या पाकळ्यांचा
गोफ गुंफतो गे तसा

बोलके डोळ्यातले तव
भाव मोहून टाकती
तुज मुखाच्या कांतीवरती
तेज किरणे फाकती

ओष्ठ कलिका हासताना
झेलती सुंदर फुला
मन उगा माझे पुन्हा का
स्वप्नं पाहून घे झुला

नासिकेच्या चाफेकळीवर
चांदणीची चांदणी
अन झुब्यांच्या हेलकावी
झुंबराची टांगणी

मान वेळावून ऐसे
पाहते का तू मला
जीव ओवाळून टाकीन
प्रियतमे तुजवर भला

त्या फुलांच्या ताटव्याला
स्पर्श कोमल तुजसवे
तूच माझी भाग्यरेखा
तू प्रिये जगणे नवे

दि.२४/१०/२०२४
सकाळी ०९.४७ वा.



## (२८)
## ठेव दे देवा अशी

जांभळ्या रंगतली नटवर
फुले जी लाजरी
आत लेऊन डोलती जणु
रेशमाची की जरी


पारदर्शी मन सुमन हे
हळव्या रंगाचे खरे
कोण सांगे कानी कैसे
ल्यायचे रंगा बरे

बीज मातीतून गढता
अंकुराची उगवणी
सोडता जागा स्वयेची
निर्मिती हो देखणी

बीज जाते अंकुरही तो
रोपटे जाते कुठे
जाते कलिका फूल येते
फूल जाऊन फळ तिथे

जीवनाची वेल लगडे
मोद पुष्पांनी जशी
रंग हवे ते वेगळाले
ठेव दे देवा अशी

दि.२५/१०/२०२४
रात्री १०.२८ वा.



## (२९)
## कोणती ग गीतिका तू

कोणती ग गीतिका तू
छेडीशी मनमोहिनी
वाजवून वीणेस रसिके
शोभते तू रागिणी

कुलीन ऐसी वेशभूषा
थाटमाटाचा ग बाज
कंकणे ते दागिणे ते
बसणे तुझिये घरंदाज

मोरपंखाचा हवेरा
ठेवलेला तुजसवे
सूर जाती आसमंती
रोज किती ते नवनवे

त्या जळाच्या शांत शीतल
रम्य तीरावर कशी
तू कलावती आळवीशी
शारदेचे स्वर जशी

अंगुली त्या सहज फिरती
गीत उमटून ये जरा
काय तो आनंद म्हणू गे
भोवताली भरे खरा

दि.२६/१०/२०२४
रात्री ०९.०८ वा.



## (३०)

## निसर्गातली रम्य दिवाळी

कुणी उजळले दीप त्या तिथे
झाली दिपवाळी
सजून गेली भिजून गेली
प्रकाशात आळी

झाडांवरती उतरून आल्या
सुमनांच्या चांदण्या
जणू आगळी पहा दिवाळी
उमलून हे सांगण्या

आकाशातील कंदील सारे
फांद्यांवर लटकले
रस्त्यांवरती सडे रेशमी
तेजाचे टाकले

स्नेह दिव्यांची माळ ओवली
लक्ष्मीसाठी कुणी
येईल चालत पूजेसाठी
तयारीस पाहुनी

निसर्गातली रम्य दिवाळी
दीप उजळता धरा
अशी खुलावी जणू फुलावी
अलगद वसुंधरा

दि.२७/१०/२०२४
रात्री १२.३२ वा.




## (३१)
## गोधन ऐसे धन हे अपूर्व

वसु म्हणजे ऐश्वर्य संपदा
द्वादशी देई सदा
धेनु वत्स संपत्ती खरी ही
राहती दूर विपदा

दिवे दिवाळीचे यादिवशी
उजळून जाती घरी
आसमंत तम भरला असला
तेज चमकते तरी


गोधन ऐसे धन हे अपूर्व
गोरस अमृत पान
स्वर्गामध्ये कामधेनू ही
भूवरी तिचाच मान

अखिल देवता जिच्यात वसती
ती गोमाता महान
सेवा करुनी वत्स व्हावे हो
दुग्धपाना लहान

म्हणून आधी गोमतेची
सवत्स पूजा येते
त्यानंतर दणक्यात आपुली
दीपावली ही होते

चला जपू या परंपरांना
संस्कृती सनातनी ही
विश्वशांतीचा बंधुत्वाचा
वसा देते मनी ही

दि.२८/१०/२०२४
सायं. ०६.३० वा.
वसुबारस, गोवत्स द्वादशी
शुभ दीपावली



## (३२)
## धनत्रयोदशी येते

लक्ष्मी कुबेराची कृपा
सदोदित आम्हावरी
आज पूजन तयांचे
होत जाय घरोघरी

धन संपत्ती मिळावी
वाढावी ती वाढवावी
लक्ष्मी वास घराण्यात
अवकळा सारी जावी

एक धन आरोग्याचे
यत्नाने राखायचे
धनवंतरी कृपा होता
काय सांगा मागायचे

आधी देह स्वस्थ ज्याचा
त्याचे मन चित्त स्वस्थ
जीवनाची सार्थकता
अंतरंग आत्मस्थ

अश्विन वद्य पक्षामध्ये
धनत्रयोदशी येते
धन दिवाळीचे जणु
उधळीत मोद देते

दि.२९/१०/२०२४
रात्री ०८.५७ वा.
धनत्रयोदशी दीपावली निमित्ताने
तेजोमय शुभेच्छा



## (३३)
## सांगा दिव्यास कोणी

सांगा दिव्यास कोणी
वेडे झुरायचे ना
खाणाखुणा मनीच्या
ठेवत उरायचे ना

वण राहतील स्नेहल
जेथे तुम्ही जळाले
मिटवू शके न कोणी
इतके मुरायचे ना

आता तरी शिकावे
जगणे नवे स्वतःचे
कोणासही हवे ते
तैसे स्फुरयचे ना

अंधारलेल्या राती
तेजास घेत हाती
वातीस आणि ज्योतीस
इतके चुरायचे ना

बघता जमेल का हो
उजळून आत येणे
दारात की उरातून
इतके नुरायचे ना

सांगा दिव्यास कोणी.....

दि.३०/१०/२०२४
सायं. ०५.४० वा.



## (३४)
## तेजा देऊन जाते

नरकचतुर्दशी नरकासुराच्या
विजयाची गाथा
श्रीकृष्णाच्या सत्यभामेच्या
चरणी टेकवू माथा

असुर माजला होता भयंकर
नरकासुर नामे
अत्याचारे पीडा स्त्रियांना
दुष्ट तयाची कामे

प्रागज्योतिषपूर नगरीमध्ये
सोळा सहस्र नारी
बंदी करुनी बळे विवाहे
ठरवून अत्याचारी

श्रीकृष्णाने सत्यभामेसह
त्यावर केली चढाई
रथा चालवून भामा राणी
खरी साथी ती होई

गरुडावरती आरूढ होऊन
असुर ठार तो केला
सोळा सहस्र नारी आणिक
प्रजेस आनंद झाला

मरता मरता वर तो मागे
आजच्या दिनी प्रभारी
सूर्योदय होण्याच्या आधी
स्नान करी नरक हारी

म्हणून अभ्यंगाच्या होती
सुरू मंगल अंघोळी
पापे हरतील नरके सरतील
लिहा पुण्याच्या ओळी

अशी दिवाळी घराघरातून
संस्कृती घेऊन येते
अंधाराला करून दूर ती
तेजा देऊन जाते

दि.३१/१०/२०२४
सकाळी ०९.३२ वा.



## (३५)
## लक्ष्मीपूजन करावे

बळी कारागारातून
लक्ष्मीसह देवतांना
सोडविले श्रीविष्णूने
अश्विन अमावस्या जाणा

दिवाळीची अमावस
लक्ष्मीपूजन करावे
अष्टवसु देत माता
दान समृद्ध ठरावे

हिरे माणकं नि सोने
चांदी धन चलनी जे
पूजनात ठेवूनिया
वाढे कृपा फळणी ते

आजच्याच दिनी माता
संचारते भूलोकात
गुणी कर्मशील कुणी
शोधे स्थिर निवसास

घरातून अलक्ष्मीला
दारिद्र्याला घालविते
त्याच केरसुणीचीही
लक्ष्मीरूपे पूजा होते

दुग्ध खीर साळी लाह्या
बत्ताशे हो प्रसादाला
सडा रांगोळ्या आरास
शोभा दिपवे प्रासादाला

तिला स्थिर रहाण्यासाठी
मनोभावे आवाहन
आज कृपाळू गे माये
होवो तुझे आगमन

सारी धांदल नि घाई
तिच्या स्वागताची झाली
घरी लक्ष्मी हो माझ्या
वाजतगाजत की आली

तिन्ही सांजेला पूजेला
उपचार करुनियां
रोषणाई आसमंती
मनी मोद भरूनिया

पिढ्यानपिढ्या लक्ष्मीचा
वास घराण्यात राहो
माझ्यासह वंशजांना
तुझी ऋद्धि सदा लाभो

दि.०१/११/२०२४
रात्री ११.५४ वा.
दीपावली लक्ष्मीपूजन शुभचिंतन



## (३६)
## वाढो मधुर गोडवा

बलिप्रतिपदा आज
विक्रम संवत्सर नवे
नव्या व्यापाराच्या राशी
नोंदण्यास सज्ज व्हावे

बटुरूपात विष्णूने
बळी पाताळी धाडीला
द्वारपाल त्याचा होत
भक्ती न्याय ही काढिला

शुभमुहूर्त पाडवा
सोने खरेदीला चला
वाढे ऐश्वर्य संपत्ती
असा पाडवा हा भला

लेकी बापा ओवाळीती
पत्नी पतीला तसेच
प्रेम बंध घट्ट होवो
देवा नात्यात असेच

गोवर्धन पूजा चाले
कृष्णदेव राऊळात
अन्नकुट म्हणतात
व्यंजने हो नैवेद्यात

साडेतीन मुहूर्तात
अर्धा मुहूर्त पाडवा
दिवाळीत जीवनात
वाढो मधुर गोडवा

दि.०२/११/२०२४
सकाळी ०९.३५ वा.
दीपावली पाडवा शुभचिंतन



## (३७)
## भाऊबीज ओवाळीते

मुक्ताई नि ज्ञानेशाची
आज किती सय आली
भावा बहिणीच्या नात्याला
गोड जरतार झाली

तिची त्याच्यावर माया
त्याची काळजी सखोल
कसे नाते नि जिव्हाळा
बंध प्रेम अनमोल

तुझे माझे की जमेना
तुझ्याविना करमेना
नाते गोड हे अतूट
मन कुठेच रमेना

भळभळत्या जखमेला
सांधे द्रौपदीचा शेला
कृष्ण मायेसाठी पहा
तिच्या दारी की हो गेला

बालपणीच्या स्मृतींनी
गर्दी मनाच्या अंगणी
स्नेह जगावेगळा
येई सुवास चंदनी

भाऊबीज ओवाळीते
तुला भाऊराया
सदा राहू दे तुझी
माझ्या पाठीशी रे माया

दि.०३/१०/२०२४
सकाळी ०९.३५ वा.



## (३८)

**दे सख्या मज प्रीत भावन**

दाटल्या या भावना
आभाळागत भरलेल्या
आठवांचे मेघ आणिक
दामिनी त्या ठरलेल्या


कोणत्या रे वादळांनी
हेलकावे खायचे
कोठुनी कोठेही मग रे
मनमेघांनी जायचे

डोंगरांची रांग जर का
अडविण्याला थांबली
गर्दी होते भावनांची
आत उडते धांदली

बरसुनी जातात डोळे
भीज ओली वाहते
का तुझी इतुकी प्रिया रे
वाट वेडी मी पाहते

एक वर्षा वर्षता ही
आस ना होते कमी
दे सख्या मज प्रीत भावन
जगण्याची बघ ती हमी

दि.०४/११/२०२४
रात्री ११.५५ वा.



## (३९)
## भाग्यवती मज हातीची

ऐक राणी ऐक माझे
प्रीतभरले सांगणे
तू सदा माझीच म्हणता
गाली हसले चांदणे


सारुनी विरहास दूरी
मीलनाच्या वाटुल्या
काळजाच्या वाटेवरती
गोड मधुरा भेटुल्या

सांधताना रेशमाचे
मल्मली धागे जरा
मोहवी मज भाळवीतो
मोहिनी तव चेहरा

भास नि आभास सारे
आसमंती दंगले
तेवढ्यातच स्वप्न आपुले
सप्तरंगी रंगले

मागतो मी रोज त्याला
साथ राहो साथीची
ही सखी ही प्रीत वेडी
भाग्यवती मज हातीची

दि.०५/११/२०२४
सकाळी ०४.३५ वा.



## (४०)
## छंद कमळ जडू दे न जीवा

किती टवटवीत कमळफुलें ही
जळात उमलून आली
पंक कितीही लिपटून पायी
उषा नवी तरी झाली

दले पसरली देठाभोवती
विसावुनी जणू झुकलेली
दुःख बुडाशी तरी कमळे ही
दुःख भावना मुकलेली

उगाच नाही आसन होऊन
लक्ष्मीचे खुललेले
अनुरक्तीने नयनकमल हे
प्रियतमास भुललेले

मुखकमळाची शोभा सांगते
हृदयकमल किती गोड
आत्मकमळ उमलून येई तो
नसे कशाची तोड

प्रसन्न कांती कमळफुलांची
हसणारी कुमुदिनी
मृणालिनी दलिनी कमलिनी
सुरेख हो प्रमोदिनी

असे उमलू दे पुन्हा खुलू दे
मना भुलू दे राजीवा
इंदीवर अरविंद पंकजा
छंद कमळ जडू दे न जीवा

दि.०७/११/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (४१)
## आजही जेंव्हा पाहतो सुरंगी

मन का अडकून पडते
सुरंगीत हे माझे
तो काळ सुगंधित सुंदर
आजही हृदयी साजे

उंच कुठे त्या विशाल तरुवर
इवली इवली सुमने
गोड मधुरशा सुवासात जी
धुंद आपुली मने

रंग कांचनी पिवळा पिवळा
स्पर्श मुलायम होई
आजही माझे काळीज सखये
गजऱ्यात सुरंगी होई

किती रमलेला काळ तो होता
मी तू प्रीत भरलेले
तिथेच कोण्या कवीस होते
गीत अमर स्फुरलेले

आजही जेंव्हा पाहतो सुरंगी
आठव होते ताजी
कशी होतसे सखे तू माझी
अनूनयाला राजी

दि.०६/११/२०२४
रात्री ११.५८ वा.



## (४२)
## वाटे मला कितीदा

माझ्या मनात तेंव्हा काहीच भाव नव्हते
वसले अजून वेडे प्रेमाचे गाव नव्हते

तुज वाटले तसे ते नव्हते उगा इशारे
वाहत्या नदीचेही ग बघ कोरडे किनारे


येण्यास काळजात नव्हती जरीही बंदी
माणूस बुजरा होतो नव्हतो कधीच छंदी

उडत्या बटांमध्ये तो घालून वारा पिंगा
जेंव्हा करून जाई समवेत तुझ्या दंगा

वाटे मला कितीदा सांगू कशी मी प्रीत
वाटे पटेल का ग तुजला ती माझी रीत

मांडे मनी मनीचे राहून तेव्हा गेले
दिसता किती दिसांनी तू जागे मजसी केले

दि.०८/११/२०२४
सकाळी ०६.४९ वा.



## (४३)
## जगणे खरे असावे

आता कुणास सांगा
भेटावयास जावे
प्रत्येक माणसाने
आपुल्याच कोषी रहावे

दुःखास वाट मिळणे
आता कठीण आहे
दुःखास आत दाबून
जगणे दिखाऊ आहे

गेले दिवस ते गेले
गप्पा नि भेटी होती
आले मनी ते बोलू
मनमोकळीच नाती

आता उगाच आखून
का घेतल्यात सीमा
ही बंधने फुकाची
जगण्याचा मार्ग धीमा

हसणे न असते आतून
खळखळ झरे ते आटले
जगण्यात राम नाही
ते बेगडीच वाटले

एकाकीपण उदासी
आतून घेरलेली
माया जिव्हाळा गेला
पोतेरी फेरलेली

जगणे खरे असावे
हसणे तसेच ओठी
आपुलकी वसावी
आभाळाएवढी पोटी

शब्दात जोडण्याचा
मधु गोडवा दिसावा
चेहरा खराखुरा हो
पारदर्शी हसावा

दि.०९/११/२०२४
सकाळी ०८.४३ वा.



## (४४)
## गाव तोच रेखावा

आठवणींच्या हिंदोळ्यावर
झुलते मन माझे
कुठे राहते कुणास तगाउक
ना सोबत तनमन माझे

तिथल्या डॉगर दऱ्या दुशालीत
हिरवाईच्या दंग
एक मनाला चढत जातसे
उत्साहाचा रंग

वाट मोकळी जराजराशी
ओली ती हो चिंब
माणसातल्या माणुसकीतून
निखळ मनाचे बिंब

सान झोपड्या अथवा राहोट्या
कुट्या काड्याकुड्यांच्या
आनंदातून डोलत जातील
तृषा कधी न माड्यांच्या

परतून आले शरीर तिथुनी
काळीज परतत नाही
थोडेही त्या सृष्टीमधुनी
वेडे सरकत नाही

जणु राहतो खोल तळाशी
हृदयाच्या देखावा
जरी एकटी मनात माझ्या
गाव तोच रेखावा

दि.१०/११/२०२४
सकाळी १०.०४ वा.



## (४५)
## काट्यातल्या गुलाबा रे

गुलाबाच्या फुला
कसे सांगू राजा तुला
सखी मनामध्ये घर
करू दे न मला

तुझ्या मदतीने तिचे
जिंकावे हृदय
नव्या नव्या प्रीतीचा रे
व्हावा की उदय

राग रुसवे की प्रेम
तुझ्या सोबतीने
वाढू दे रे ओढ आमची
वाऱ्याच्या गतीने

तुझा रंग तुझा गंध
तुझा छंद गोड
दोघांमध्ये तुझ्यामुळे
बंध तो अजोड

काट्यातल्या गुलाबा रे
दुःख तुझ्या तळी
तरी सुखा वाटतोस
फूल की कळी
असशी फूल की कळी

दि.११/११/२०२४
सकाळी ०९.४२ वा.



**(४६)**

## ऐक बा विठ्ठला

ऐक बा विठ्ठला
जीव कासावीस झाला
डोळे वाटेला लावून
माथा तुझ्या चरणाला

पाप पुण्य ना माहीत
मला तुझा एक ठाव
देवा समजून घे रे
माझा भोळा भक्तीभाव

चंद्रभागेच्या जळाशी
जशी शीतलता राहें
माझ्या मनात तुझ्याच
आधाराची नदी वाहे

बाप जगताचा तूच
माय रखुमाई संग
तुझ्या गाभाऱ्यात जीव
मन गजरात दंग

आज संपली ती नीज
तुला जाग आता आली
देवा तुझी माझी भेट
उपवासी गोड झाली

दि.१२/११/२०२४
रात्री १०.०५ वा.



## (४७)
## हातातल्या गुलाबाने

हातातल्या गुलाबाने
मोगऱ्याला खुणावले
गंधाने धुंद वारे
परिमळ दुणावले

तिच्या केशकलापात
गजऱ्याची वीण
गुलाबाची खोवण
ती रूपगर्विण

कपोलांचे स्पर्श तिच्या
जणू पाकळ्या
उमलून सहवासी
तिच्या येती कळ्या

गाणे कुणीतरी गाते
धुंद धुंद सूर
तिच्या ओढीलागी
माझ्या हृदयाला पूर

रंग तिचा गोरा गोरा
अंग चंदनाचे
गुलाबाचे स्पर्श तिचे
गीत स्पंदनांचे

सांगा तिला कुणीतरी
झुरतो मी इथे
देह मजजवळी परी
मन तिच्या तिथे

दि.१३/११/२०२४
रात्री ११.३४ वा.




**(४८)**

**लावण्ये घडविले**

पावसाळ्यातील सरी सराव्या
ओल्या रस्त्यातून
पसरून जावे धुके धुकेसे
काय दिसे त्यातून

गर्द केशरी पानांवरती
थेंब घसरती जेव्हा
पाने ओघळून येती खाली
अलगद ओली तेव्हा

दुरदूरवर कुणीच नाही
कुणीच सोबत येथे
तरी मनाने पुन्हा पुन्हा का
रमण्या जावे तेथे

ओल्या थांबांच्या ओळीतूम
पाऊस लिहितो गाणी
आपण पाहतो झरझर आले
मेघातून हे पाणी

सूर तयाचे मल्हारी ते
ताना टपटपताना
उंच कधी तर कधी खालचे
अवरोह आरोह घ्या ना

काळ्या काळ्या सडकेवरती
दर्पण कुणी ठेविले
पहा स्वतःच्या प्रतिबिंबाला
लावण्ये घडविले
तयाने लावण्ये घडविले

दि.१४/११/२०२४
सकाळी ०९.१२ वा.



## (४९)
## भाग्यज्योती उजळे

कधी कोणते पुण्य फळाला
येईल ना जाणे
पर्वकाळ सापडे आपसूक
ईशचरणी रहाणे


येतील काही संकेतांच्या
ओळी भाळावर
लिहिल्या असतील भेटी गाठी
कुणी हो काळावर

काहीच नसते माहीत तरीही
घडती दिव्य दर्शने
आत्मिक मिळते संतुष्टी ती
क्वचित आत्मदर्शने

वात तेवते दिव्यात जैसी
भाग्यज्योती उजळे
कृपाप्रसादे जन्मोजन्मीचे
संचित सहजी फळे

कुत्सित कर्मांच्या गत लेखणी
संपतात येथे
आणि युगांच्या किती प्रतीक्षा
थांबतात येथे

दि १५/११?२०२४
रात्री ०९.४७ वा.



## (५०)
## नवसूर्याचा उदयगिरी

काठावरती मजा चालते
कोण सागरी डुंबावे
वाळूतील पाऊलखुणा या
जरा जळा तू थांबावे

लाटांवरती लाटा येतील
सुख दुःखाच्या फेसाळून
येतील आणिक जातील म्हणुनी
नका बसू हातपाय गाळून

मधेच वारा कधी दिलासा
घेऊन येईल आकाशी
कधी संकटे आणून वादळ
घोंघावत जगण्यापाशी

गाज सागरा देशील गंभीर
आत सखोल तू सांग किती
मोजून दिधले श्वास तयाने
परी थांग ना कळे म्हणून भीती

येतील नौका जातील होड्या
कुणी ऐलतीरी पैलतीरी
नव्या जगाच्या क्षितिजावरती
नवसूर्याचा उदयगिरी

दि.१६/११/२०२४
रात्री ११.४९ वा.



## (५१)
## सुंदर जीवन सुंदर लोचने

आकाशातील रंग मोहिनी
उतरून येते जेव्हा भूवरी
जलाशयातील प्रतिबिंबाने
मोहित होते तीच तियेवरी

मीच आहे का इतकी माधुरी
मीच सुंदरी प्रश्न पडे
तिच्या भोवती गोड गोडुले
फिरते कोडे असेच घडे

उमलून आल्या कळ्या हासल्या
पाकळ्यात निज खळ्या पहा
आणि परागांच्या सुरभीने
सुगंध वेडा करी अहा !

जळात उठती नाजूक लाटा
भेटून वाटा शोधू जरा
वृक्ष डोलतो आनंदाचा
मधोमध जीवनी खरा

त्या मेघांच्या मालेवरती
आशा आकांक्षा राहती
सुंदर जीवन सुंदर लोचने
चित्र सुखाचे जे पाहती

दि.१७/११/२०२४
रात्री ११.५३ वा.

## (५२)
## हे वेडाचे वेडूऽऽ कोडे

वेड्या नाजूक वळणावरती
वेडेपण ये भरामधे
वेड्या भेटी होऊन काही
वेड्या स्मृतींच्या घरामधे

वेडून वेड्या वेडभावना
वेडावून येतात पुन्हा
वेडाच्याच भरातून घडतो
प्रीतीचा वेडात गुन्हा

वेड्या वेड्या घिरट्या घालून
वेडी पक्षीण भरवे पिल्ला
वेड्या धीरा उरात वीरा
राखून नेती गड किल्ला

वेड्या क्रांतीतून निपजली
वेडी बेडी तोडकृती
वेड चांगले जडता संस्कृती
वेड वेडता हो विकृती

वेड्या वात्सल्याच्या गावी
वेडी माया माय वेडी
वेड्या वाटेवरी गावची
मनात वसते ओढ वेडी

हे वेडेपण आंदण व्हावे
द्यावे घ्यावे थोडे थोडे
वेडावरती सोडून द्यावे
हे वेडाचे वेडूऽऽ कोडे

दि.१८/११/२०२४
सकाळी ०८.२९ वा.



## (५३)
## झाडा तुझ्या फांदीवर

झुलणाऱ्या झुल्या तुला
कसे सांगू गूज
वाऱ्या सवे चाले माझे
हळू अलगूज


किती माझ्या मनातले
ताण घालविशी
क्षणामध्ये चेहऱ्यावर
हासू तू आणीशी

उंच उंच नभातून
फिरवून आण
हवेवरी घोळ नाही
आशा माझ्या जाण

खुसखूस खसखस
पिकलीय छान
सख्या साऱ्या मिळुनीया
उठवू या रान

झाडा तुझ्या फांदीवर
जीव टांगलेला
माहेराच्या आठवांनी
भाव रंगलेला
भाव रंगलेला

दि.१९/११/२०२४
रात्री ०७.१५ वा.



## (५४)
## मोहित वेळ ही करते

पहाट होता मनात जागे
नव्या युगाची आशा
दिवस वेगळा नव्या दमाचा
नवी प्राचीवर उषा

आकाशातील रंग सांगती
काहीतरी नव्याने
खगही सुंदर घेत भराऱ्या
किलबिल गाती गाणे

दिनकर येतो उगवून आता
लाल केशरी थोडा
दौडत जाईल त्याच्यासंगे
दिवसरूपी हा घोडा

पानाफुलांना जागवून ही
सकाळ तरतरी देते
उठा उठा हो सकळिक आता
जगणे नवे ती देते

कसे सांगावे हवेत अत्तर
कोण सकाळी भरते
सुगंध नाना भुलवुनी मना
मोहित वेळ ही करते
मोहित वेळ ही करते

दि. २०/११/२०२४
सकाळी ०६.३९ वा.

## (५५)
## त्या देवाचे काय त्यात हो

कुणी लिहिलेल्या असतील भाळी
नशिबाच्या त्या ओळी
कधी कुणाचे भाग्य फळफळे
तर फाटकी कुणाची झोळी

अन्न अन्न दशा होई कुणाची
कुणी धान्याचा स्वामी
नोकर चाकर कुणा राबती
कुणी मजूरी कामी

कुणी पाय ना ठेवी भूमीवर
कुणी तुडवितो काटे
कुणास अगदी सरळ मार्ग तर
कुणास अगणित फाटे

निजाया कुणा मऊ शय्या अन
कुणी दगडावर झोपे
कुणास कोणी घाले पायघड्या
कुणास कोणी थोपे

कुणा नशिबी भाग्यवती कुणी
रत्न नारी ती लाभे
कुणा नशिबी येई अवदसा
जीवन त्रागे त्रागे

नशीब संचित पुण्य पाप की
आणखी काही दिसते
त्या देवाचे काय त्यात हो
दैव कर्म निज असते

दि.२१/११/२०२४
सकाळी ०८.४९ वा.



## (५६)
## जगणे असेच चाले

सागर सुंदर नभ हे मनोहर
रम्य तरुवर राजी
मोहित करती शांत सावल्या
निळीशार रंगराजी

शुभ्र वालुका मेघही ढवळे
एकमेकी मिसळले
गडद निळे अन फिके आकाशी
हिरवे रंग हे सगळे

दूर चालती नौका काही
आपुल्या धुंदीत
कुठे त्या ठाऊक आहेत वेड्या
जीवन बंदीत

जोवर येतील हलक्या झुळुका
तोवर प्रवास सुखकर
जशी वादळे देती तडाखे
मन हो वेडे दुखकर

जगून घ्यावे आयुष्याचे
क्षण सुंदर जे आले
येऱ्या झाऱ्या चालू द्याव्या
जगणे असेच चाले

दि.२२/११/२०२४
रात्री १०.४५ वा.




## (५७)
## पापणी कोरली येथे

ही पुष्पराणी नाव पापणी
कोरीव डोळ्यावर
जणू लवलेली मदनपापणी
मोहित नयनावर

निळे जांभळे डोळे पाणीदार
विशाल लोचनदल
उघडझाप चालते निरंतर
रमणीची चंचल

काय पाहते कुणास ठाऊक
रानोमाळी राणी
तिच्या भोवती फूलपाखरे
गाती सुंदर गाणी

त्या नेत्रांवर अलगद कोणी
चुंबन का दिधले ते
लाजून लाजून गेली मिटुनी
डोळे गूज वदले ते

आता कोणी येईल रसिक नि
बुडून जाईल तेथे
अशी साजरी किती लाजरी
पापणी कोरली येथे

दि.२३/११/२०२४
रात्री ११.४३ वा.



## (५८)
## मधे वाहते जीवन सरिता

संथ वाहत्या नदीस येथे
भेटतो की नगराज
पाहून तन्वी अवखळ चंचल
लेई हिरवा साज

गर्द हरित एका काठावर
निवांत पहुडले डोंगर
जणू वयस्कर कुणी घरातील
नजर ठेविती चहुवर

दुसऱ्या काठावरी तारुण्ये
मुसमुसलेली सृष्टी
हिरव्या पोपटी कवळ्या तृणांची
रसरसलेली दृष्टी

एक ऐलतीर आयुष्याचा
कळ्या भरलेल्या कवळ्या
एक पैलतीर जरठ पानुल्या
गळणाऱ्या झावळ्या

मधे वाहते जीवन सरिता
दो काठांची धारा
उदयाचली वा अस्तालाही
देत राहे सहारा

दि.२४/११/२०२४
सकाळी ०८.२७ वा.



## (५९)
## तैसीच वाटे ही चूल जननी

चुलीच्या तोंडात
लाकडांचा आहार
भुकेला देवा
चुलीचाच आधार

जाळून देह काष्ठ
जगवीतात जीव
होऊन कोळसा ते
तरी जगणे असे भरीव

म्हणतात कधीही
ना विझावी घरात चूल
मुखी भकभक आग
तरी लाल अंगार फूल

तीन दगडांची
असते कमाल चूल
उपाशी पोटी भूक
भागवून जाते चूल

देते हिवात ऊब
देते गरम दिलासा
द्यावा जळण्याचा सांगा
चुलीने कसा खुलासा

उपकार अनंत करते
भरिणी पोषिनी ती तोषिणी
जाळते स्वतःस जैसे आई
तैसीच वाटे ही चूल जननी

दि.२६/११/२०२४
दुपारी ०४.३७ वा.



## (६०)
## नतमस्तक होई मी चरणी जगन्नाथा

नाथा जगन्नाऽऽऽथा,
तव चरणी टेकवून माथा
लाभे जीवाला समाधान ऐसे,
वैकुंठ जणू हा येई मज हाता

बलभद्र आणि सुभद्रे सवे तू
अवतरला येथे पुरी पावन झाली
किती पुण्य असता इथे दर्शनाला
चारी धामांच्या मध्ये सामावली

रथोत्सव वार्षिक तव चाले निराळा
गुंडीचा मातृभगिनी भेटाया गेला
लक्ष लक्ष जण येती रथ ओढण्याला
संसार हा जगन्नाथाचा रथ झाला

ती भव्यता ती दिसे दिव्यता ही
वास्तू शिल्पांची अती कोरीवता
असाधारण मूर्ती कौशल्य प्रकटे
ते धन्य कलाकार त्यांची गुणवत्ता

राजा अनंतवर्म चोदगंग
त्याच्या काळी पूर्ण हो मंदिरंग
पूर्णाविष्करण ही उत्तम कलाकृती
जतन झालेली उच्च संस्कृती

मंदिराची या असते विशेषता
कधीही न पडते छाया भूवरीता
ही दिव्यत्वाची अजुनी प्रचीती
नतमस्तक होई मी चरणी जगन्नाथा

दि.२५/११/२०२४
रात्री १०.२३ वा.



## (६१)
## जगणे सुंदर व्हावे

असतील नसतील रसिक कुणी कुठे
आम्ही उमलतो आमुचे
हसणे, फुलणे, गंध उधळणे
चाले आमुचे आमुचे

रंग कोणते कुणा लाभतील
द्वेष ना येतो सुमनी
संग केवढा सुंदर असतो
हर्ष उफाळे उन्मनी

हलक्या हलक्या येतील झुळुका
डोलून द्यावे अंग
गाणे गाईल वारा जेंव्हा
हळूच व्हावे दंग

कुठे पोचणे की इथेच सुकणे
कुणा न माहीत काही
तरीही चिंता मनास वेड्या
सतावीत त्या नाहीत

हासून घ्यावे मनमोकळे
डोलून बोलून घ्यावे
जगण्यासाठी काय हवे मग
जगणे सुंदर व्हावे
ऐसे जगणे सुंदर व्हावे

दि.२७/११/२०२४
रात्री १०.४९ वा.

## (६२)
## माणूस आपलं जगणं सारं

पहिल्यासारखा गारवा आता
गावोगावी उरलाच नाही
थरथरून थंडीमध्ये
हात कुणी धरलाच नाही

शेकोट्यांची ऊब होती
अंगणामध्ये रस्त्यामध्ये
आता फॅशन म्हणून जॅकेट
प्रत्येकाच्या अंगामध्ये

उन उन जेवणासाठी
चुलीभोवती गराडा
गरमागरम भाकरीसंग
चव द्यायचा मस्त खरडा

अंघोळीला सुट्टी व्हायची
गप्पा गरमा गरम
ताटामध्ये वाफाळलेला
भात नरमा नरम

कुडकुडत दात वाजायचे
दिवाळीच्या अभ्यंगाला
फराळ आणि फटाक्यांची
मजा यायची दंग्याला

चुलीतल्या निखाऱ्यांनी
ऐकले होते गूज कुणाचे
शेकता शेकता मन मोकळे
होत असे प्रत्येकाचे

आपलं माणूस कुशीत यायचं
बाळ आईला बिलगायचं
दुःख आपसूक थंडीसवे
आपुलकीने विलगायचं

का असे ऋतू फिरले
बेभरवशी वागणं आहे
माणूस बदलून गेला आहे
सृष्टीला डागण्या देत राहे

कसली थंडी कसली गरमी
पाऊस तर कधीही येतोय
माणूस आपलं जगणं सारं
आपणच विनाशाला नेतोय

दि.२८/११/२०२४
रात्री ११.३८ वा.



## (६३)
## इवली चिमणी राहते मनी

चिव चिव चिमण्या गोजिरवाण्या
रूप कस देखणं
जीव इवलुसा झेप आकाशी
अंगण खुश राखणं

दाण्यासाठी घरी दारी ग
गोड चिवचिवाट
पाण्यासाठी नकोच वणवण
वाहतील पाट

बाळगोपाळा संगे तुमचे
किती चालती खेळ
घरट्यामध्ये पिल्लं घालतील
लाडा कोडाचा मेळ

काडी काडी कापूस माडी
शेज मऊशार छान
घरटे सुंदर पाहून हरवे
इथे कुणाचेही भान

इवली चिमणी राहते मनी
बालपणीची साथ
पुन्हा तुला ग बागडण्याला
देईन माणूस हात

दि.२९/११/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (६४)
## रीत कशी मोगऱ्याची

हसून उमलत्या मोगऱ्याला
कसे सांगावे दुःख
विरहामध्ये अजून वाढते
प्रिया भेट रुख रुख


त्याला काही माहीत नाही
गंध वेडावतो
प्रिया दूरवर जीव खालीवर
किती तो भंडावतो

वर तापती झळा उन्हाच्या
आत आग विरहाची
तशात उमलून डोलून जातो
रीत कशी मोगऱ्याची

तिच्या कुंतली विराजताना
कर माझे गंधाळती
कितीकितीदा मने नव्याने
सौंदर्यी भाळती

नको हसू तू गोड एवढे
ऐक जरा मोगऱ्या
क्षणास करशील दोघांमधल्या
धुंद सुरभीने साजऱ्या

दि.३०/११/२०२४
०६.३४ वा.



## (६५)
## इथे विसावती कला

मेघ पांघरले कुणी
नग कळस दिसेना
नभ गुडूप झाले हो
कुणा कुठे गवसेना


कुणी हिरवी पोपटी
सांगा दुलई घेतली
आत दडून कुणी हो
पाचू माळ ती वेचली

तरुवर एकटाच
उभा शांत नि निवांत
त्याची सावली खेळते
ऊन सावल्यांचे भ्रांत

इथे गुंजते कुणाचे
फक्त एकाऽऽकीपण
नसे आवाज रवाचा
मूर्त एऽऽक टाकीपण

इथे विसावती कला
इथे चित्र रंगतात
रसिकांसवे नित
कलाकार दंगतात

दि.०१/१२/२०२४
सकाळी ०८.५७ वा.



## (६६)
## अशी पहावी जरा बकुळी

कुठून आणली नाजूक बकुळी
हार मधुर गोवला
सान कुडी इवली इवली
स्पर्श तिचा कोवळा

श्रीकृष्णाच्या गळ्यात पडली
रंग सावळी बकुळी
पारिजातका सोडून घेतो
श्याम सुंदर बकुळी

गंधाचे हो काय पुसावे
मंद सुगंध दरवळ
फुलली अथवा सुकली तरोही
भुलवून जातो परिमळ

कुठून निर्मितो इतुकी सुमने
हळवी हळवी रसिकवर मने
लाजून रहाते दूर दूरशी
वेडी बकुळी मना लपवणे

अशी पहावी जरा बकुळी
स्मरता स्मरता तिची ती खळी
प्रिया तर माझी इतुकी नाजूक
तनु वेलीवर वदन सदन कळी

दि.०३/१२/२०२४
रात्री ११.१८ वा.



## (६७)
## ईश आहे आसरा

उड जीवाच्या पाखरा रे
तोड बंधन पिंजरा
मुक्त आकाशात उडता
तू पहा मुक्ती घरा

कर्म बंधन हात रेखील
आपुल्या जन्मास सीमा
कोणते ते लेख असतील
पाप अणिमा पुण्य गरिमा

जेवढा ज्याचा पिंजरा
तेवढे स्वातंत्र्य त्याचे
एक क्षण येईल कोणी
उघडुनी देईल खाचे

त्या क्षणाला ओळखून
सज्ज जर उडण्यास तू
एक नभ विस्तारलेले
त्या पल्याड जाण्यास तू

बघ उगवला सूर्य पूर्वा
सोड आशा रे जरा
त्या तिथे श्रीपाद परम नि
ईश आहे आसरा

दि.०४/१२/२०२४
सायं ०६.५३ वा.



## (६८)
## **सांगते सृष्टी ही काय**

हा किनारा हलका वारा
दे दिलासा या मना
सावळ्याशा श्यामरंगी
सागराची साधना

त्या नभातून रंग पडतो
या जळातुन मावतो
जीव वेडा पंख लेऊन
झेप घेण्या धावतो

वाटते आयुष्य ऐसे
गूढ ते तळ ना कळे
काय आणि केंव्हा येथे
कैसे कोठून आकळे

एक उर्मी जागते ती
क्षणी पुन्हा विलयास जाय
चालते ते चक्र नेमीच
सांगते सृष्टी ही काय

पाठमोरी तू पहावी
ही छबी माझी अशी
सामोरी मी जात राहीन
जीवनाला नित जशी

दि.०५/१२/२०२४
रात्री ११.५४ वा.



## (६९)
## जा उडा फुलपाखरांनो

जा उडा फुलपाखरांनो
जगण्या ना बांधो कुणी
जे श्वास तुम्हा लाभले
अलवार मग सांधो कुणी

उगवतो तो सांजसमयी
चंद्रमा आल्हाद दे
त्या नभातून जी उडे ती
माळ खग प्रल्हाद दे

रंग असतील नानाविध
अंगावरी आकाशीही
तेवढे उल्हास ठेवा
रात्र तम वा प्रकाशीही

पारदर्शी साचेबंद
बरणी कोणी ठेविली
जीवन हे मग नाम दिधले
बंदी तेथे राहिली

सोड त्या बंधास आणिक
मोकळे तू श्वास घे
तूच वेड्या तुज जीवाला
वेगळाले ध्यास दे

दि.०६/१२/२०२४
रात्री १०.१२ वा.



## (७०)
## नखशिखांत साजामध्ये

बघ नटले मी सजले आहे
प्रिया तुझ्यासाठी
वाट पाहणे जीवघेणे बघ
ठरेल माझ्यासाठी

शृंगारातून उजळून गेले
लावण्य हे माझे
आभूषणे अन साज हे सारे
अंगावर साजे

पातळ सजवून देते काया
अंबाड्यातून गजरा
तुझ्या स्वागता उभी इथे मी
मुखडा माझा हसरा

हिरव्या चुड्याची किणकिण गोडी
खेचत तुजला आणील
पायातील मज पैंजण घुंगरू
प्रीत तुझी बघ जाणील

नथ मुरडते नाकी माझ्या
कुंकूम भाळी खुलते
कानी झुबे अन कर्णवेल ही
मन सजनाचे भुलते

हळूच येशील चाहूल देशील
मिठीत मिटवून घेशील
क्षणात राजा मला वेगळ्या
जगात आपुल्या नेशील

मग तू राजस पघळून जाशील
विलीन माझ्यामध्ये
खुणा प्रीतीच्या सोड मुलायम
नखशिखांत साजामध्ये

दि.०७/११/२०२४
रात्री १०.५० वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक – संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर – ४०० ००५

  ई–मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/ सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली (मिश्र कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(मिश्र कविता) - अक्षरा, अनुरंग, नवीनवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, दरवळ तुझे नि माझे, लोभसवाणी, (मन) मनमनुल्या, वेध मनाचा, शब्द

पाखरा, मन मोहरून माझे, (अध्यात्म) – निरव नमन, (जीवनपर) – क्षणांचं देण, आयुष्याचं गाव, (फुल) – फुललेलं मौन, (निसर्ग) – सुख सुखाचं, पानापानातली कथा, (प्रीत त्याची तिच्यासाठी) – स्पंदन रेषा, (सुख–दुःख) – सुखाचा किनारा, (नानी) – थांब जरा तू, (गंध–सुगंध) – दूर त्या तिथे, आनंद गंधपाणी, (स्त्री जीवन) उडण्या हे आभाळ, संस्कृत बालगीत संग्रह – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, सुधीर शास्त्री यांचा मराठी काव्य संग्रह 'मनुष्य' या पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – मनुष्यः, शब्द तुझ्या नावाचे, घडते नवेच काही.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१

- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री – डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम -<br>"सर्ग_निसर्ग" ऑडिओ<br>अल्बम - "मंजुमंजिरी" | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग - १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग -२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १०४
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : २८
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •